# “ ज्ञानाची शेती ”
# बियाणे उगवण क्षमता तपासणी

**श्री. अंकुश बरडे, एम.एस.सी. (कृषी)**

**बियाणे उगवण क्षमता तपासणी म्हणजे काय ? :-**

ज्यावेळेस आपण एखाद्या पिकाचे घरचे, पारंपारिक बियाणे पेरणीसाठी वापरत असतो त्यावेळेस ते बियाणे पेरणीसाठी योग्य आहे का? हे पेरल्यास उगवेल का ? किती टक्के उगवेल ? म्हणजे पेरताना दाट की पातळ पेरावे लागेल आणि ते बियाणे या हंगामासाठी पेरण्यास योग्य आहे का? याची खात्री करण्याचा एक उपाय म्हणजेच बियाणे उगवण क्षमता तपासणी होय.

आपल्याकडे मुग, उडीद, चाऱ्यासाठीचा मका, खरिप ज्वारी, सोयाबीन व तूर या पिकाची लागवड करत असताना या पिकाचे सुधारित, निवड पध्दतीने विकसित केलेले वाण वापरले जातात. म्हणजेच शेतकरी पहिल्या वर्षी या पिकाचे बाजारातील सिलबंद पिशवीतील बियाणे विकत आणतात व ते पुढील दोन हंगामासाठी, आलेल्या उत्पादनामधून चांगले निवडलेले ठोकर बिया बाजूला करून पुढे पेरण्यासाठी सांभाळून ठेवतात. परंतू अशा घरच्या बियाणाची शुध्दता, अंकुरण क्षमता म्हणजेच उगवण क्षमता तपासणी करणे अत्यंत आवश्यक असते.



**कोणत्या पिकाची बियाणाची उगवणक्षमता तपासणी करावी :-**

– घरचे, मागच्या हंगामातील पिका मधून बियाणे म्हणून राखून ठेवलेले धान्य.

– सुधारित वाणाचे बियाणे.

– सोयाबीन, तूर, मूग, उडीद, मका, ज्वारी सुधारित वाणाचे पिकाचे बियाणे.

– मागील हंगामातील कापणी, मळणी करत असताना किंवा ईतर काही कारणाने बियाणे खराब होण्याची शक्यता असल्यास उदा. अतिवृष्ठी, अवेळी पाऊस, किड व रोगाचा प्रकोप ई. अश्या बियाणाची तपासणी जरूर करावी.

– विकत घेतलेले पिशवीतील सरळ वाणाचे वरिल पिकाचे बियाणाची उगवणक्षमता खात्री करण्यासाठी करू शकता.

**बिज उगवणक्षमता तपासणी करण्याचे फायदे :-**

– बियाणेचा दर्जाबाबत खात्री होते.

– बियाणाचे पेरणीसाठी आवश्यक प्रमाण समजते.

– प्रति एकर रोपांची संख्या योग्य राखल्याने उत्पादकता वाढीस हातभार लागतो.

– शेतकऱ्याचा गॅप (खाडे) भरण्यासारखा अतिरिक्त खर्च वाचतो.

– शेतकऱ्याचा हंगाम वाया जाण्याची शक्यता राहत नाही.



**बियाणे उगवणक्षमता तपासणीचे पध्दती :-**

– शोषकागदाचा वापर करून उगवणक्षमता तपासणी करता येते.

– वर्तमान पत्राचा कागद वापरू उगवणक्षमता तपासणी करता येते.

– वाळूमध्ये उगवणक्षमता तपासणी करता येते.

– कुंडीमध्ये उगवणक्षमता तपासणी करता येते.

– गोणपाटाचा वापर करून उगवणक्षमता तपासणी करता येते.

या सर्व पध्दतीचे आपणास बियाणे उगवणक्षमता तपासणी करता येते. यामध्ये शेतकऱ्याकडे वर्तमानपत्राचा कागद (पेपर) व गोणपाट सहज उपलब्ध होत असते त्याचा वापर करून आपण बियाणे उगवणक्षमता तपासणी करण्याबाबतची माहिती घेऊ.

– प्रथम आपणास ज्या बियाणाची उगवणक्षमता तपासावयाची आहे ते बियाणे घ्यावे. हे बियाणे घेताना एकाच पोत्यातून घेऊ नये म्हणजेच बियाणे तपासणीसाठी प्रातनिधिक नमुना घ्यावा. त्यासाठी बियाणाचे सर्व पोती / पिशव्या मधून थोडे-थोडे बियाणे घेवून ते मिसळून त्यातून तपासणीसाठी बियाणे घ्यावे.

- त्यानंतर आपलेकडे असलेला पेपर अथवा गोणपाट ओला करून घ्यावे त्यातील पाणी नितळून घ्यावे व त्याचे घडी करून चौकोनी / आयताकृती अंथरून घ्यावे.
- नंतर आपण जे बियाणे तपासणीसाठी वेगळे काढलेली आहे ते वरिल पेपर / गोणपाटावर एका रेषेत समान अंतरावर सरळ व आडवे म्हणजेच 10 ओळी व उभ्या 10 ओळी आडव्या खालीलप्रमाणे ठेवून द्यावे व याची गुंडाळी करून सावलीचे ठिकाणी ठेवावे. यावर दररोज 2 वेळा हलकेसे पाणी द्यावे. जास्त पाणी झाल्यास बियाणे सडण्याची किंवा बुरशी लागून खराब होण्याची शक्यता असते.



- चौथ्या दिवशी ही गुंडाळी हळूवारपणे उलगडून घ्यावी व प्रत्येक ओळनिहाय बियाणाचे निरिक्षण करून त्यामधील उगवलेल्या बियाचे / रोपाचे वर्गीकरण करावे.
- ज्या रोपांची चांगली, सशक्त, निरोगी वाढ झालेली आहे ती वेगळी मोजावीत. यामध्ये चांगली तंतूमुळे आलेली, कोंबाची व्यवस्थित वाढ झालेली रोपे ठेवावीत त्यानंतर विकृत रोपे वेगळी निवडावीत व ती मोजावीत यामध्ये त्यांचा कोंब व मुळाची वाढ निरोगी नसते व बुरशीची वाढ झालेली रोपे येतात.
- तसेच काही बिया उगवत नाहीत यामध्ये काही बिया पाणी न शोषल्याने, किंवा कठीण बिया, मेलेले बिया किंवा सुप्त अवस्थेतील बिया असू शकतात. तसेच यामध्ये पोकळ, किडलेली, गर्भनसलेले बिया असू शकतात त्यांची वेगळी मोजणी करावी.
- वरिलप्रमाणे 3 प्रकारची उगवणीबाबतची वर्गवारी करावी व सदृढ रोपांची टक्केवारी काढावी व ती 70-90% पिक निहाय असल्यास योग्य समजली जाते असे बियाणे येणाऱ्या हंगामासाठी पेरणीस वापरावे.
- बियाणाची उगवणक्षमता 5-10% कमी प्रमाणात असेल तर तेवढे टक्के बियाणाचे प्रमाण वाढवून पेरणी करावी व जर बियाणे उगवणक्षमता 60% पेक्षा कमी आढळली तर असे बियाणे पेरणीसाठी वापरू नये.

**ठळक मुद्दे** :-

- बियाणे निवड प्रातिनिधिक स्वरूपातील असावा.
- बियाणे उगवणक्षमता 25 मे चे आसपास किंवा नंतर करावी.
- बियाणावर प्रक्रिया केली असेल अशा बियाणाची उगवणक्षमता तपासू नये.
- पेपर / गोणपाटाची गुंडाळी ओलसर राहिल याची काळजी घ्यावी.
- पिकनिहाय शिफारशी प्रमाणापेक्षा जास्त उगवणक्षमता असलेले बियाणे पेरणीसाठी वापरावे.
- 5.10% उगवणक्षमता कमी असेल तर त्या प्रमाणात जास्तीचे बियाणे पेरणीसाठी वापरावे.



फायद्याची व आरोग्यदायी..!